महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

परिपत्रक क्र.______ रा.मं./संशोधन/पुनर्रचित अभ्यासक्रम:२०२०-२१/दिव्यांग विद्यार्थी इ.९वी व १०वी/४९८८, दि.०९/०२/२०२१

संदर्भ: १) शासन निर्णय क्र. संकीर्ण–२११७/(११८/१७)एस.डी.६, दि.१६ ऑक्टोबर २०१८,
२) राज्य मंडळ परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/विषेश गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विषय योजना/मूल्यमापन योजना/५११२, दि.२८/०९/२०१८,
३) शासन निर्णय क्र. अभ्यास–२११८/प्र.क्र.२४३/एस.डी.४, दि.०९ जुलै २०१९,
४) शासन निर्णय क्र. संकीर्ण–२११९/प्र.क्र.(२४३/१९)एस.डी.४, दि.०८ ऑगस्ट २०१९,
५) बालभारती कार्यालयाचे जा.क्र.: ह/कार्यानुभव/४०२०, दि.३०.१२.२०२० चे (फक्त शै.वर्ष २०२१ साठी कमी करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाबाबत) पत्र,
६) बालभारती कार्यालयाचे जा.क्र.: भाषा–भाषेतर/४०२१, दि.३१.१२.२०२० चे (पाठ्य पुस्तके प्रसिध्द केल्याबाबत) पत्र,
७) एस.सी.ई.आर.टी.पुणे कार्यालयाचे जा.क्र.राशैसंप्रपम/अविवि/दिव्यांग मूल्यमापन योजना/२०२०-२१/०९, दि.०१.०१.२०२१ चे (पुनर्रचित अभ्यासक्रम अंमलबजावणी व शै.वर्ष २०२१ साठी कमी करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाबाबत) पत्र.

विषय: इ. ९ वी व १० वी च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विषेश गरजा असणा–या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमाची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजनेबाबत...

या परिपत्रकान्वये राज्यातील विषेश गरजा असणा–या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना कळविण्यात येते की, विषेश गरजा असणा–या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून इ. ९ वी व १० वी साठी "कार्यशिक्षण विषयांतर्गतची ९ पाठ्यपुस्तके" व "गृहशास्त्र, शरीरशास्त्र व आरोग्यशास्त्र" या विषयांच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचित पाठयपुस्तके महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती पुणे–४ यांच्या मार्फत तयार करण्यात आलेली असून सदर पाठ्यपुस्तकाच्या PDF स्वरुपातील प्रती www.ebalbharti.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. (संदर्भ–६) या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे–३० यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. (संदर्भ–७) इयत्ता ७ वीचे प्रचलित अंकगणित विषयाचे पाठ्यपुस्तक व प्रचलित विषय योजना आहे तशीच ठेवण्यात आलेली आहे, त्याच्यात बदल करण्यात आलेले नाहीत. राज्यातील कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शालेय वर्ष २०२०–२१ साठी २५% पाठ्यक्रम कमी करण्यात आलेला असून तो http://www.maa.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. (संदर्भ–७)

शासन निर्णय दि. १६ ऑक्टोबर २०१८ (संदर्भ–१) नुसार २२ प्रवर्गातील विशेष गरजा असणा-या दिव्यांग व इतर आव्हानात्मक परिस्थितीतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन–अध्यापन पध्दती व विविध दिव्यांग प्रवर्गाच्या अध्ययन शैलीनुसार पुनर्रचित अभ्यासक्रम २०२०–२१ वर आधारित अनुकूलित मूल्यमापन पध्दती अवलंबण्यात आलेली आहे. सदरप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून इयत्ता ९ वी व १० वीसाठी विषयनिहाय सुधारित मूल्यमापन आराखडे, लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक, वार्षिक काम यांची गुणविभागणी, प्रश्नपत्रिका आराखडा व तदनुशंगिक बाबी संदर्भातील विशेष गरजा असणा–या दिव्यांग व इतर आव्हानात्मक परिस्थितीतील विद्यार्थ्यांसाठी खालील प्रमाणे सविस्तर प्रपत्रे या परिपत्रकासोबत जोडलेली आहेत.–

प्रपत्र अ: मूल्यमापन आराखडे व तदनुशंगिक बाबी, इ.९वी पृष्ठ क्र.०३ ते ३१ व

इ.१०वी पृष्ठ क्र.३२ ते ६० वर,

प्रपत्र ब: शै.वर्ष २०२१ साठी कमी करण्यात आलेला अभ्यासक्रम, पृष्ठ क्र.६१ ते १०३ वर,

प्रपत्र क: शासन निर्णय दि.१६ ऑक्टोबर २०१८, पृष्ठ क्र.१०४ ते १२७ वर,

उपरोक्त मूल्यमापन आराखडे इत्यादींच्या प्रपत्रात नमुद केल्याप्रमाणे संबंधीत शाळा, विद्यार्थी, शिक्षक व सर्व संबंधितानी कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. सदर परिपत्रक सर्व विभागीय मंडळांमार्फत उपरोक्त विषय शिकविल्या जाणा-या शाळांना निर्गमीत करण्यात येत आहे तसेच मंडळाची वेबसाईट www.mahahsscboard.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

प्रति

---

क्र.को.वि.मं./माध्य. गोप./ 7032
कोल्हापूर-४१६००४
दिनांक : ११/०२/२०२१

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

**या पत्राची नोंद घेवून सन २०२०-२१ साठी कमी केलेला २५% अभ्यासक्रम मंडळाच्या http://www.maa.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे. तसेच विषेश गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अभ्यासक्रमाची विषय योजना व सुधारीत मुल्यमापन योजना मंडळाच्या https://mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे याची नोंद घेवून सर्व संबंधित शिक्षक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून योग्य ती कार्यवाही करावी.**

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर